जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

सभा क्र. ४२ // विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २५/०२/२०२१

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२५/०२/२०२१ गुरुवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी

दारकुंडे नवनाथ विश्वनाथ	पाटील कुलभुषण विरभान
सोनवणे मुकुंदा भागवत	लढढा नितीन बालमुकुंद
देशमुख प्रतिभा गजानन	बरडे नितीन मनोहर
चव्हाण ज्योती बाळासाहेब	नाईक प्रशांत सुरेश
बेंडाळे उज्वला मोहन	शेख सैईदा युसुफ
बाविस्कर किशोर रमेश	

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.

नगरसचिव :- आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.कोल्हे ललीत विजय व श्री.काळे अमित पांडुरंग यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे. सभा सुरु होण्यापुर्वी जळगांव महापालिकेत डॉ.सौ.विद्या गायकवाड पदोन्नतीवर जळगांव महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणुन रुजु झालेले आहेत. सर्व सभागृहाच्या वतीने जळगांव महापालिकेकडुन त्यांच स्वागत आहे. डॉ.सौ.विद्या गाकवाड हे सन २०१० ला मुख्याधिकारी संयम म्हणुन निवड प्रथम साली नियुक्ती आयुक्त नांदेड, मनपा,२०१० ते २०१४ हे आयुक्त म्हणुन नांदेड मनपात होत्या.दिवत्तीय नियुक्ती म्हणुन जिल्हा प्रशासन अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड या ठिकाणी होत्या.त्यानंतर मा.श्री.देवेंद्रजी फडणविस यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तदनंतर मनपा २०१७-१८ केंद्रीय स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत त्यांना मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्राप्त झालेला आहे. याच्या अगोदर ते अमळनेर येथे मुख्याधिकारी या पदावर होते. आता त्यांची पदोन्नतीवर जळगांव शहर महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणुन नियुक्ती झालेली आहे. तदनंतर या ठिकाणी श्री.शाम गोसावी साहेब उपायुक्त म्हणुन जळगांव महानगरपालिकेत रुजु झालेले आहे. त्यांचे स्वागत आहे. यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

नगरसचिव :- विषय क्र. १:- मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/८१३/२०२०-२०२१ दि.१५/०२/२०२१ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे.

नगरसचिव :- मा.आयुक्त साहेब यांना विनंती करतो की, यांनी मा.सभापती स्थायी समिती यांना अंदाजपत्रकाची प्रत द्यायची आहे. यानंतर सर्व स्थायी समिती सदस्य यांचे मा.उपायुक्त साहेब, श्री.प्रशांत पाटील साहेब, श्री.गोसावी साहेब आणि मुख्यलेखा परिक्षक श्री. वाहुळे साहेब यांना विनंती करतो की, यांनी सन्मा.सदस्यांच फुलगुच्छ आणि पुस्तक देऊन त्यांच स्वागत करायच आहे. त्यानंतर श्री.अनिल पाटील, प्रमुख लेखापाल यांनी सुध्दा सदस्यांच स्वागत करायच आहे. त्यानंतर मा.मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार साहेब यांनी २-३ महिन्यापासुन यावर काम केले. त्यांना विनंती करेल की, यांनी मा.सभापती महोदय यांच फुलगुच्छ देऊन स्वागत करायच आहे. या ठिकाणी मा.आयुक्त यांनी सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक मा.सभापती महोदय व सन्मा.सदस्यांपुढे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. प्रत्येकाचा या ठिकाणी एक सन्मान प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेला आहे.

श्री. नितीन लढढा :- सभापती महोदय, प्रशासनाने नक्कीच पुस्तक देऊन सन्मा.सदस्यांचा सत्कार केलेला आहे. परंतु या सभागृहाला सांगु इच्छितो की, प्रशासनाने गुलाबाच्या फुलासोबत काटेपण दिलेले आहे.तर आम्हाला सातत्याने तुमच्या काटयांकडेही लक्ष असेल आणि गुलाबाच्या फुलाकडेही लक्ष असेल.

नगरसचिव :- या ठिकाणी आजच्या अर्थ संकल्पासाठी मा.आयुक्त महोदय त्यांचे मनोगत व्यक्त करतील. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे.

मा.आयुक्त :- सन्मा.स्थायी समिती सभापती, आजच्या अर्थसंकल्पीय सादरीकरणाच्या विशेष बैठकीला उपस्थित सर्व सन्मा.स्थायी समितीचे सदस्य, आताच आपल्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये चालु आर्थिक वर्ष सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाज आणि पुढील नविन आर्थिक वर्ष सन २०२१-२२ याचा मुळ अंदाज याचा अंदाजपत्रक मी मा.सभापती साहेबांना मा.स्थायी समिती समोर सादर करणेसाठी त्यांच्याकडे सुपुर्द केलेला आहे. त्यांनी ते स्विकृत केल त्यासाठी मी त्यांना मनपुर्वक सुरुवातीलाच त्यांचे आभार व्यक्त करतो.मा.सभापती महोदय, महाराष्ट्र अधिनियमातील कलम ९५ अन्वये आज मी जळगांव शहर महानगरपालिकेच्या आयुक्त या नात्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत अंदाज आणि पुढील आर्थिक वर्ष सन २०२१-२२ या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक आपणा सर्वांना सादर करीत आहे. अंदाजपत्रकाच्या सादरीकरणाला सुरुवात करण्यापुर्वी काही महत्वाची बाबी या ठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते. मा.सभापतींच्या परवानगीने मी नमुद करत आहोत. चालु वर्ष म्हणजे सन २०२०-२१ एका वेगळया कारणामुळे सर्वांच्या आठवणीत राहणार आहे. अर्थातच आपण ते लवकरात लवकर विसरावे अशीच सर्वांची मनोकामना आहे. कारण या वर्षाच्या सुरुवातीला सर्वत्र कोविड-१९ या महामारीचा आरंभ झाला.आणि जागतिक पातळीवर, देश पातळीवर, राज्य पातळीवर तसेच आपल्या शहर पातळीवर सुध्दा याचा प्रादुर्भाव आपल्याला साधारणत: मे पासुन लागण्यात आला.जळगांव शहर आणि जिल्ह्यामध्ये साधारण मे २०२० पासुन कोविड-१९ चा मोठया प्रमाणात आकड्याची सुरुवात झाली. केंद्र आणि राज्य शासनामार्फत वेळोवेळी मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत कोविडचा प्रसार थांबविण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. त्याप्रमाणे कोविडची लागन झालेल्या रुग्णांसाठी महानगरपालिकेमार्फत कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले. शहरातील काही सार्वजनिक तसेच काही स्वयमसेवी संस्थांनी याच्या मध्ये महानगरपालिकेला अत्यंत मोलाची मदत केली. राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात महानगरपालिकेला निधीही उपलब्ध करुन दिला. शहरातील सर्व संस्था, व्यापारी अस्थापना तसेच नागरीकांनी प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करुन आपली जबाबदारी गांभिर्याने पार पाडली. या सर्वांच एकत्रित परिणाम होऊन आपण कोविडची साथ नियंत्रणात ठेवण्यात यशस्वी झालो. या कोविड दुरदशेला लढा देणेत आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री, सन्मा.खासदार सर्व सन्मा. आमदार तसेच आपल्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या सामान्य जिल्हा रुग्णालयाचे सर्व चिकीत्सक तसेच शासकीय महाविद्यालयाचे चिकीत्सक तसेच शासकीय महाविद्यालयाचे इतर स्टाफ त्याच प्रमाणे आदरणीय महापौर, आदरणीय उपमहापौर, आदरणीय स्थायी समिती सभापती, आदरणीय विरोधीपक्ष नेते, सर्व पक्षांचे गटनेते, महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व सर्व सन्मा.नगरसेवक यांनी वेळोवेळी प्रशासनाला सक्रिय सहकार्य केले. त्या बद्दल मी प्रशासनाच्या वतीने या सर्वांचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो. या कामामध्ये शहरातील सर्व स्वयमसेवी संस्था तसेच कोरोना योध्दा ज्यांनी याच्यामध्ये हिरेरीने भाग घेतला आणि प्रशासनाला प्रत्यक्ष मदत केली त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. या कामामध्ये स्व:ताची आणि स्व:ताच्या जिवाची परवा न करता सेवा करणाऱ्या महानगरपालिकेचे डॉक्टर्स, नर्सेस आणि अन्य वैद्यकीय कर्मचारी, महानगरपालिकेमध्ये सफाई सेवेचे काम करणारे सर्व स्वच्छता कर्मचारी, ठेकेदारामार्फत सेवा करणारे सर्व कर्मचारी, स्वच्छता निरिक्षक तसेच प्रभाग कार्यालय आणि आपले मुख्य कार्यालय मधील सर्व कर्मचारी यांनी अत्यंत जबाबदारीने काळजीपुर्वक काम केले. या सर्वांचा अभिनंदन आणि त्याच प्रमाणे सर्वांचे मनपुर्वक आभार. या सर्व काळामध्ये नागरीकांमध्ये जनजागृती करणे तसेच शासकीय सुचना तसेच शासकीय यंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या उपाययोजना यांना योग्य प्रसिध्दी देणे आणि या प्रसंगी या उपाययोजने मधील त्रृटी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन त्यामध्ये सुधारणा करणे ही अत्यंत मोलाची कामगीरी सर्व प्रसार माध्यमांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडली याबद्दल मी सर्व प्रसार माध्यमांचे आणि त्यांचे प्रतिनिधींचे महानगरपालिकेच्या वतीने मनपुर्वक आभार व्यक्त करतो. सद्या पुन्हा कोरोनाचा काही प्रभाव वाढत आहे. त्यावर ही महानगरपालिकेमार्फत पुर्वी प्रमाणे उपाययोजना करण्यात

येतील. आणि पुन्हा दुसरी लाट येते की काय याच्यावरती सुध्दा आपल्याला शहरातील नागरीकांचा आरोग्य हे आबादीत ठेवण्यासाठी ज्या उपाययोजना आहे त्या सर्व महानगरपालिकेमार्फत करण्यात येतील. आता आपण या वर्षाचा सुधारीत आणि पुढील वर्षाचा मुळे जेकाही जमा खर्चाचे अंदाजपत्रक आहे. त्या मुळ विषयावर आपण बोलु या. जळगांव शहर राज्यातील अत्यंत झपाट्याने वाढणारे शहर आहे. लोकसंख्या वाढीचा वेग आणि शहराचा नागरीकरण पाहता शहराच्या पायाभुत सुविधांवर ताण वाढत चाललेला आहे. जळगांव महानगरपालिकेचे अंदाजपत्रक एक महत्वाचा घटक असुन त्या माध्यमातुन लोकांच्या अपेक्षा पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असणार आहे. अंदाजपत्रक वास्तव वाढीव, सोलांश दृष्ट्या परिपुर्ण लेखा सिध्दांतानुसार वर्गीकरण केलेले आणि अधिक परिणामकारक असणे हे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार अंदाजपत्रकात तपशील आर्थिक नियोजन पारदर्शक माहिती असणे आवश्यक आहे. जळगांव शहरात वाढत्या समस्या आणि पारदर्शकतेचा ताण विचारात घेता, त्यावर मात करुन उपाययोजना करणेसाठी महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता भासणार आहे. सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाजपत्रक तयार करत असतांना उत्पन्नाच्या अतिशय सुक्ष्म बाबींचा विचार करुन प्रत्यक्ष प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विचार करुन जमे मध्ये कोणतीही अवाजवी वाढ न करता उत्पन्न व खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे. व त्याचा परिणाम म्हणुन अंदाजीत केलेले उत्पन्न प्रत्यक्ष प्राप्त होण्याचे चिन्हे आजच्या वसुलीच्या आकडेवरुन दिसत आहे. अस मला या ठिकाणी नमुद करावे असे वाटते. जळगांव महानगरपालिकेचे वसुली उत्पन्न आणि दायीत्व पाहता, अर्थ संकल्पीय अंदाज तयार करतांना किंवा नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान असुन महानगरपालिकेच्या वसुली उत्पन्नावर भर देऊन ते पुर्ण करावे लागणार आहे. सन २०२०-२१ चा सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना त्या पुर्ण विभागांच्या कामाचा आढावा प्रलंबित दायीत्व याचा विचार करण्यात आलेला असुन त्यानुसार पुढील वर्षी नविन कामांसाठी तरतुदी प्रस्तावीत करण्यात आलेल्या आहे. चालु आर्थिक वर्ष अखेर पर्यंत शहरातील काही महत्वाचे योजनांविषयी आपल्याला थोडी फार चर्चा आपण करणार. चालु वर्षाच्या अखेरीला शहरातील पथदिवे बदलुन एल.ई.डी.चे पथदिवे लावण्याची ई.ई.सी.एल. कंपनी बरोबर चालु असेलेली योजना पुर्ण होणे अपेक्षित आहे. आता ती योजना पुर्ण झाल्यानंतर आपण त्या योजनेचा जे मुळ उद्देश मान्य केलेला आहे. त्याच्या मध्ये विज वापरामध्ये बचत होणाऱ्या दैनंदिन व येणाऱ्या विज खर्चामध्ये आपल्याला बचत अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे मुळ या योजनेमध्ये जेवढे आपण ईलेक्ट्रीक पोल समाविष्ट केलेले होते. त्याच्या नंतरच्या मधल्या दोन वर्षामध्ये वेगवेगळया निधीतुन आपल्याकडे जादा पोल टाकण्यात आलेले आहे. पुर्वीच्या पोल ज्या ठिकाणी विद्युत व्यवस्था नव्हती अश्या सुध्दा पोलवर आपल्याला ते दिवे बसावे लागणार आहे. आता त्यासाठीचा सुधारीत आकडेवारी आम्ही काही दिवसात येणाऱ्या महासभेपुढे सादर करत आहोत. महासभेच्या मान्यतेने आपण शहरातील सर्व विद्युत पोलवर ज्या ठिकाणी दिवे असतील किंवा नसतील. या योजनेमार्फत आपण एल.ई.डी.दिवे बसविण्याची योजना आपण पुर्ण करुन घेणार आहोत. याच बरोबर सन २०२१-२२ या आगामी वर्षामध्ये अमृत पाणीपुरवठा योजना तसेच भुमीगत गटारी योजना पुर्ण करुन कार्यवाही करणे सुधारीत घनकचरा अहवालास शासनाकडुन मान्यता प्राप्त करुन घेऊन त्याचे प्रत्यक्ष कामास सुरुवात करणे, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत राज्य शासनाने तत्वता मान्यता दिलेल्या १०० कोटी रुपयाचे प्रकल्पास शासनाकडुन अंतिम मान्यता प्राप्त करुन घेऊन त्याप्रमाणे प्रत्येक्ष काम पुर्ण करणे आणि मनपाच्या निधीतुन शहराच्या महत्वाचे रस्तेंची कामे करणे प्रस्तावीत आहे. जळगांव शहराच्या विकास योजनेची मुदत यापुर्वी सन २०१३ मध्ये संपुष्टात आली असुन त्यामुळे जळगांव शहर विकास आराखडा नव्याने करणे गरजेचे आहे. याप्रमाणे सद्यास्थितीत जमिनीच्या वापराचा नकाशा existing guide new plan याच काम आता अंतिम टप्प्यात आलेले असुन प्रत्येक्ष विकास योजनेला ॲड करणाऱ्या कामाला सुरुवात होणे अपेक्षित आहे. या कामासाठी सुध्दा अंदाजपत्रकामध्ये ३.२५ कोटीची तरतुद सुचविण्यात आलेली आहे. आता याच्यानंतर पुढच्या वर्षामधील काही योजना आहे. आपण प्रत्यक्ष मी काही सुधारीत आणि नविन अर्थ संकल्पामध्ये जे आपण जमा आणि उत्पन्नाचे जे आकडेवारी मांडलेली आहे. त्या विषयावर आपण चर्चा करु या. सुरुवातीला मा.स्थायी समिती सदस्यांना एक बाब निदर्शनास आणुन देऊ ईच्छितो की, यापुर्वी महानगरपालिकेचा अर्थ संकल्प किंवा आयुक्तांमार्फत सादर करणारे जे जमा खर्चाचे जे अंदाज आहे.ते ज्या नमुन्यामध्ये सादर केले जात होते. त्या नमुन्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये बदल करुन सुधारणा करुन अधिक

पारदर्शक पध्दतीने सर्वांना म्हणजे नागरीक असतील, सन्मा.नगरसेवक असतील किंवा अधिकारी कर्मचारी असतील अधिक सुलभपणे समजुन घेतील. या पध्दतीने आपण याची रचना केलेली आहे. आपल्याला माहित आहे. आपल्या अधिनियमामध्ये आपल्या अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने तीन घटक वेगवेगळे भाग आपण मांडलेले आहे. महानगरपालिकेला स्व:ताच्या स्त्रोतापासुन मिळणारे उत्पन्न, राज्य शासनापासुन वेगवेगळया कामांसाठी मिळणारे अनुदान, त्याच्या मधुन जी आपण जमा आणि खर्च आकडेवारी मांडतो. तो अर्थ संकल्प त्याला अधिनियमामध्ये अर्थ संकल्प ''अ'' म्हटलेले आहे. अर्थ संकल्प ''अ'' चे पुन्हा तीन भाग आपण केलेले आहे. एक म्हणजे महसुली उत्पन्न आणि महसुली खर्च, दुसरे भांडवली उत्पन्न आणि भांडवली खर्च. आणि तिसरे असाधारण जमा आणि असाधारण खर्च म्हणजे ज्याला खुली भाषामध्ये आपण देव घेव म्हणतो. जी रक्कम आपल्याकडे येते आणि आपण शासनाला, किंवा नागरीकांना किंवा जे मक्तेदार असतील त्यांना परत करतो.ना तो आपला उत्पन्न आहे ना तो आपला खर्च आहे. अश्या प्रकारे आपण त्याला देव घेव म्हणतो. अश्या प्रकारे तीन भाग आहे. आता याच्यामध्ये महसुली जमा खर्च. त्याला भाग-एक आपण म्हटलेले आहे. भांडवली जमा आणि भांडवली खर्च त्याला भाग-दोन आणि असाधारण जमा आणि असाधारण खर्च त्याला भाग-तीन, अस भाग-एक दोन आणि तीनचा एकत्रितपणे आपण अर्थ संकल्प अ म्हटलेला आहे. ज्याची अधिनियमामध्ये कलम ९५ अन्वये स्पष्ट तरतुद करण्यात आलेली आहे. यानंतर अर्थ संकल्प ''ब'' मध्ये परिवहन सेवांचा जमा आणि खर्चाचा अंदाजपत्रक मांडतो. अर्थात आपल्या जळगांव शहरात सद्यातरी आपण परिवहन सेवा चालवत नाही त्यामुळे हा अर्थ संकल्प आपला निरंकच असणार आहे. परंतु ज्या महानगरपालिका स्थानिक पातळीवर परिवहन सेवा देतात. त्यांच्यासाठी हा सुध्दा महत्वाचा आहे. त्यानंतर अर्थ संकल्प ''क'' जो आपल्या अधिनियमातील प्रकरण १२ आणि १३ आहे. म्हणजे जलनिस्सारण, मलनिस्सारण आणि प्रकरण १३ म्हणजे पाणी पुरवठा या दोन किंवा तिन म्हणु आपण, पाणी पुरवठा, जलनिस्सारण आणि मलनिस्सारण या तिनही सेवाच्या बाबतीमध्ये आपल्या अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्रपणे अर्थ संकल्पीय अंदाज ते आयुक्तांनी मांडणे अपेक्षित आहे. आणि स्थायी समितीने सुध्दा या वेळेला अंदाज सादर करायचे आहे. त्यावेळेला स्व:ता हा अर्थ संकल्प सादर करायचा आहे. त्याप्रमाणे आपण पाणी पुरवठा, जलनिस्सारण आणि मलनिस्सारण याच्यासाठी अर्थ संकल्प क तयार केलेला आहे. या प्रकारे अर्थ संकल्प अ, अर्थ संकल्प ब, अर्थ संकल्प क या तिघांचा एकत्रिकरण आपला महानगरपालिकेचा अर्थ संकल्प होणार आहे. याच्या व्यतिरिकत आपण याच्या मध्ये आपल्या अधिनियमातील कलम ९५ क नुसार ज्या सेवा आपण नागरीकांना देतो. त्या सेवा पुरविण्यासाठी येणारा खर्च, त्या सेवा पुरविण्यापोटी आपण नागरीकांकडुन घेणारे चार्जेस किंवा कर याच्या मधुन मिळणारा उत्पन्न याचा एक लेखा झोका मांडायचा आहे. थोडक्या मध्ये समजा आपण पाणी पुरवठाचे उदहारण घेतले. तर पाणी पुरवठयापासुन मिळणारे उत्पन्न आणि त्याच्यावर होणारा खर्च, या दोन्हींची सांगड लागुन ही सेवा आपण स्वयमपुर्ण पध्दतीने करवितो की, त्याच्या मध्ये आपल्याला काही तोटा येतो. या गोष्टी नमुद करायच्या आहे. याला आपण अनुदानी सेवा म्हणतो म्हणजे Subsidise Services याचा अर्थ असा की, समजा पाणी पुरवठ्यापासुन आपल्या १० कोटीचे उत्पन्न आहे मात्र खर्च जर त्याच्यावरती १२ कोटी होणार असेल तर खर्चापेक्षा उत्पन्न कमी. म्हणजे आपली योजना स्वयमपुर्ण नाही. हा जो २ कोटीचा फरक आहे हे आपण महानगरपालिकेच्या उत्पन्नातुन पाणी पुरविठेला दिलेले अनुदान आहे. आणि याला आपण अनुदानीत सेवा म्हणतो.आता कायद्यामध्ये जे अपेक्षित आहे. ज्या अश्या प्रकारच्या अनुदानीत सेवा आपण देतो. त्याच्यामध्ये अनुदानाचा प्रमाण किती टक्के आहे. त्याच प्रमाणे अनुदान आपण जे देतो आहे पाणी पुरवठयावर याला लागणारे उदहारणात आपण बघितल २ कोटी रुपये कुठुन येणार. म्हणजे अर्थातच महानगरपालिकेचा स्वत:चे उत्पन्न जातो. म्हणजे कुठुन आपण ही रक्कम तोटा भरुन काढणार. याची आकडेवारी याचे प्रमाण आणि ही जी सबसिडी देतो आहे याचा फायदा शहरातल्या कोणत्या वर्गाला मिळत आहे. आता पाणी पुरवठयाचे जर उदहारण आपण घेतल, तर पाणी पुरवठयामध्ये येणाऱ्या खर्चापेक्षा आपला उत्पन्न निश्‍चितच कमी आहे. याचा सर्व साधारण लाभ शहरातल्या सर्व लोक ज्यांच्याकडे नळ कनेक्शन आहे त्यांना होणार आहे. परंतु विशेष जर आपण बघितल, तर आपले जे वेगवेगळे स्लम मध्ये राहणारे नागरीक आहे आपण ज्यांना रेग्युलर दरापेक्षा निम्य दराने कर आकारतो. रेग्युलर जर रु.२०००/- चा दर असेल तर अश्या लोकांना जे आर्थिक दृष्टया सक्षम नाही त्यांच्यासाठी आपण रु.१०००/- चा दर आकारतो. पाणी पुरवठया मध्ये जर सबसीडीचा फायदा सर्वसाधारण सर्व नागरीकांना होत असला तरी विशेष फायदा स्लम मध्ये राहणारे जे विशेष नागरिक आहे. त्यांच्यासाठी आपण देतो. अश्या पध्दतीने हा आपण अनुदानीत खर्चाचा तपशील आहे. याबरोबर

महानगरपालिकेद्वारे ठेवण्यात आलेला विशेष निधी आहे. त्या विशेष निधींच्याही बाबतीमध्ये आपल्याकडे कोणकोणत्या निधी आहे त्याच्यामध्ये किती शिल्लक आहे. या वर्षात त्याच्यामध्ये जमा आणि खर्च कसा होणार. आणि आकडयांची शिल्लक कशी राहणार. या विषयाचे सविस्तर तक्ते त्याच्यामध्ये दिलेले आहे. या व्यतिरिकत एक नविन तक्ता आम्ही त्याच्यामध्ये देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जो आपल्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. बऱ्याच वेळेला आपण अस मानतो की, महानगरपालिकेमध्ये जर रु.१००/- टॅक्सची डिमांड असेल तर कुठल्याही कराची वसुली ही १०० टक्के होत नाही. आम्ही जमा म्हणजे उत्पन्नाचा अंदाज वर्तवितो. जर रु.१००/- ची जर मागणी असेल. तर रु.१००/- पैकी किती वसुल होऊ शकेल याचा अंदाज टाकायचा आहे आणि तो अंदाज म्हणजे आपली ८० टक्के वसुली होणार आहे. तर रु.१००/- पैकी रु.८०/- वसुल झाले म्हणजे रु.२०/- आपले येणे बाकी राहिले. ज्याला अर्थ संकल्पीय भाषेमध्ये आपण ॲसेट म्हणतो. ती रक्कम आपली आहे .तर आज नाही तर उद्या आपल्याकडे येणार आहे. किंवा मराठी मध्ये आपण त्याला मत्ता म्हणतो. त्याच प्रमाणे काही बिले आपले असे आहे की, आज ते आपल्याकडे आलेली आहे आपण आज त्यांना देणे लागतो. आपल्या आर्थिक परिस्थिती प्रमाणे किंवा आपल्याकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे आपण देऊ शकत नाही त्यामुळे ही लायबीलीटी आहे. हे दायीत्व आहे. म्हणजे एका बाजुने येणे रक्कम म्हणजे मत्ता आणि दुसऱ्या बाजुने दायीत्व, तर मत्ता आणि दायीत्वाचा स्टेटमेंट सुध्दा आपण या ठिकाणी दिलेल आहे. जेणे करुन आपल्याला महानगरपालिकेवरची आर्थिक परिस्थितीवर एक प्रकाश टाकता येईल की, आपले येणे रक्कमा किती आहेत आणि आपले देणे रक्कमा किती आहेत. आणि दोन्हींचा ताळमेळ जर आपण बघितला तर नक्की आपण प्लस मध्ये आहोत की नाही. आणि मग येणे देणे रक्कमा आणि येणे रक्कमाचा लवकरात लवकर देणे या दृष्टीने सुध्दा आपल्याला आर्थिक नियोजन करता येईल. यासाठी आपण मत्ता आणि दायीत्वचा तक्ता आपण यासोबत जोडलेला आहे. अश्या प्रकारे हा जो नविन फॉरमेट आहे. हा अर्थातच आपले जे लेखा संहिता आहे. १९७१ ची त्या लेखा संहितेच्या नमुन्यामध्ये आपण दिलेला आहे. पुर्वीच्या तुलनेमध्ये पारदर्शी आहे. आणि माहिती आपल्याला उपलब्ध होणार आहे. आणि त्याच आकलन करणे आपल्या सर्वांना शक्य होणार आहे. तर माझी विनंती आहे की, आपला हा जो नविन मसुदा आहे. तो आपण सर्वांनी मान्य करावा. आणि या मसुद्यामध्ये जर आपण यापुढच्याही कालावधीचा बजेट करु शकलो. तर मला वाटतो त्याची अमलबजावणी करणे त्याला समजुन घेणे आणि सर्व सामान्याला सुध्दा याचा अर्थ समजुन घेणे हे अधिक सोपे होणार आहे. आता प्रत्येक्ष आकडेवारीचा जर आपण विचार केला, सन २०२०-२१ जे सुधारीत अर्थसंकल्प आहे. त्याच्यामध्ये मी मुळ अंदाजपत्रक काही वाचत नाही. हे सर्वांना माहिती आहे कारण आपणच ते महासभेत मंजुर केलेले आहे. फक्त सुधारीत जे अंदाज आहे त्याच्यामध्ये वसुली जमा जी आहे. आता वसुली जमा मध्ये महानगरपालिकेचे स्वत:चे उत्पन्न आणि राज्य शासनाकडुन मिळणारी जी वसुली अनुदान आहे. त्याचा समावेश येतो. आता वसुली अनुदान याचा अर्थ काय ? जे अनुदान महानगरपालिकेला दिले जाते. ज्याच्यासाठी शासनाची वेगळी मान्यता घेण्याची गरज नाही. तो आपण आपल्या दैनंदिन जबाबदाऱ्या पारपाडण्यासाठी खर्च करु शकतो. अश्या प्रकारची जी अनुदान आहे. त्याला आपण वसुली अनुदान म्हणतो. रिव्हेन्यु ग्रॅन्ट आपण म्हणतो. उदहारणार्थ आपल्याला जीएसटीची ग्रॅन्ट जी मिळते. ती जीएसटीची ग्रॅन्ट विशेष कारणासाठी खर्च करावी. अश्या प्रकारे काही राज्य शासनाचे बंधन नाही. किंवा त्या जीएसटी अनुदानाच्या रकमेमधुन करायच्या कामासाठी किंवा खर्चासाठी आपल्याला राज्य शासनाची किंवा राज्य शासनाच्या कुठल्याही प्राधिकरणाची वेगळी मान्यता घेणेची गरज नाही. त्यामुळे आपण ही सगळी जी अनुदान आहे. ती आपण वसुली अनुदानात घेतो. त्यामुळे महानगरपालिकेला मिळणारी वसुली अनुदाने आणि महानगरपालिकेचा स्वत:चे उत्पन्न असे मिळुन या वर्षी २१५.६० कोटी ऐवढा आपल्याला उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेला आहे. भांडवली जमा जी आहे. याच्यामध्ये प्रामुख्याने आपल्या जर महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा जर विचार केला, आपल्या स्वत:च्या उत्पन्नामधुन आपण फार मोठी भांडवली कामे करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आपल्या शहरामध्ये जी भांडवली कामे चालतात ती संपुर्ण शासनाच्या वेगवेगळया निधी मधुन किंवा अनुदानामधुन होतात. त्यामुळे प्रामुख्याने भांडवली जमेमध्ये या वर्षी शासनाकडुन जी मिळणारी वेगवेगळी अनुदान आहे. त्याच्यामध्ये १७६.५७ कोटी ऐवढी रक्कम आपल्याला अपेक्षित आहे. आता या निमित्ताने आपल्यामध्ये असलेले अनुभवी सदस्य आहे किंवा ज्यांनी या महानगरपालिकेच्या एकुण अर्थिक परिस्थितीचा संपुर्ण अभ्यास केलेला असेल. त्यांना याची कल्पना असेल. परंतु अन्य जे नविन स्थायी समितीमध्ये आले

कदाचित याच वेळेला महापालिकेत आलेले आहे. त्यांच्या माहितीसाठी मी मुद्दा मांडु शकतो. सर्वसाधारणपणे असे समजल गेलेला आहे. महानगरपालिका किंवा नगरपालिका असेल. यांना मिळणारा जे एकुण उत्पन्न आहे. स्वत:च्या उत्पन्नाचा मी विचार करतो. त्या उत्पन्नाचे सर्वसाधारण तीन खर्चाचे घटक आहे. एक प्रशासनावर होणारा खर्च, त्याच्यामध्ये कर्मचाऱ्यांचे पगार असतील, लाईटबिल असतील, वाहने असतील, फोन असेल इस्टेशनरी असेल, ज्याला आपण प्रशासकीय खर्च म्हणतो. हा खर्च, दुसरा महानगरपालिका जी सेवा सुविधा देते. ती ऑलरेडी कामे महानगरपालिकेमध्ये झालेली आहे. त्या सगळयांची देखभाल दुरुस्तीचा जो खर्च आहे आपला, त्याला आपण महसुली खर्च म्हणतो. हा खर्च आणि तिसरा म्हणजे भांडवली खर्च ज्याच्या मधुन आपण नविन कामे घेतो. म्हणजे नविन ॲसेट जे आपण क्रिएट करतो. असे तीन भाग आहे. साधारणपणे या तिन्ही भागांमध्ये समान पध्दतीने खर्च हाणे हे त्या नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या आर्थिक सुदरुडतेचे लक्षण समजले जाते. म्हणजे जो एकुण मिळणारा आपणास उत्पन्न आहे. त्याच्या साधारणता ३५% खर्च जास्ती ज्यादा सामान्य प्रशासन किंवा प्रशासकीय बाबींवर व्हावा. ३० ते ३५% खर्च हा देखभाल दुरुस्ती म्हणजे आहे ती व्यवस्था चालु ठेवण्यासाठी व्हावा. असा दोन्ही मिळुन जर आपण बघितल तर ७०% पर्यंत हा खर्च जातो. आणि उर्वरित ३०% खर्च हा महानगरपालिकेच्या भांडवली कामांवर होणे अपेक्षित आहे. जेणे करुन आपण म्हणतो की, शहरामध्ये नविन कामे दिसत नाही, शहराचा विकास होतांना दिसत नाही. तो जो विकास आहे ह्या नविन कामांमधुन दिसणार आहे. आपल्या समोर डांबरी रस्ता आहे. खड्डे पडले आपण तो दुरुस्त केला. नागरीकांच्या दृष्टीने नविन सुविधा काहीच नाही. हा रस्ता कालही होता आजही आहे. परंतु एखाद्या कॉलनीमध्ये काल पर्यंत डांबरी रस्ता नव्हता आज आपण ते रस्ता नव्याने बनविला. तर त्याच्या दृष्टीने मिळणारी ही नविन सुविधा आहे हे भांडवली कामे आहे. अश्या प्रकारच्या भांडवली खर्चावरचा प्रमाण एकुण उत्पन्नाच्या साधारणता ३०% असाव. म्हणजे तिन्ही समान प्रमाणावर जर खर्च झाला तर त्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही चांगली आहे अस समजल जाते. आता याच्या दृष्टीने आपण आपल्या महानगरपालिकेची तुलना करण्याचा प्रयत्न केला. तर आपला आस्थापना किंवा सामान्य प्रशासनवरचा खर्च हा साधारण ५०% पेक्षा जास्त आहे. उत्पन्न कमी असल्यामुळे आपला हा महसुली खर्च हा जवळपास ४० ते ४५% आहे. आणि हे दोन्हीही जर एकत्र केले तर ९० ते ९५% हे खर्च आपली महापालिका चालविणेसाठी खर्च होतो. आणि मग शहरामध्ये नविन काम करण्यासाठी आपल्याला ४ ते ५% व १० ते २० कोटी पेक्षा जास्त उपलब्ध होत नाही. ही आज आपली आर्थिक परिस्थिती आहे. ह्या सर्वांचा विचार आपण अर्थ संकल्पाच्या निमित्ताने करणे गरजेचे आहे की, जेणे करुन आपल्याला आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ करता येईल. जेणे करुन नागरीकांना आपल्याला नविन सुविधा देता येईल. किंवा या सुविधांचा स्तर आपल्याला वाढविता येईल. पुढच्या वर्षी साधारणता या वर्षी सुधारीत मध्ये ३६.९१ ऐवढी जमा आपण धरलेली आहे. आणि त्याची जी शिल्लक आहे सगळी मिळुन, शासनाकडुन येणाऱ्या ग्रँडस, अमृत योजनेमध्ये मिळणारे निधी, नगरोत्थान मध्ये आलेला निधी, घनकचऱ्यामध्ये मिळालेला निधी या सगळयांसह ३३०.२१ कोटी ऐवढी आपली शिल्लक आहे. परिवहन मध्ये आपला अर्थात काही खर्च होत नाही. त्यामुळे याचा जमा खर्च फक्त ३३७०००/- ऐवढा आहे. पाणी पुरवठयाची जी जमा आहे. ती २१.४६ कोटी ऐवढी अपेक्षित आहे आणि मलनिस्सारण अर्थातच आपल्याकडे मलनिस्सारण योजना नसल्यामुळे याच्या मधुन आपल्याला सामान्य करातुन जो कर जमा होतो. त्याचा हिस्सा आपला १.७८ कोटी असे एकुण मिळुन आपल्याला ७७९.६६ कोटी आपला या वर्षाचा सुधारित अंदाज आहे. जो सन २०२०-२१ ला महासभेने मंजुर केलेला तो अंदाज होता. तो १२०१.०२ कोटी ऐवढा आहे.अर्थात येथे एक बाब आपण विचारात घेतली पाहिजे. आपण १२०१ कोटी जेव्हा जमेला घेतलेला होता. त्यावेळेला १००% उत्पन्न आपण जमा अपेक्षित धरली होती. जी व्यवहारीत दृष्टया ऐवढ शक्य होत नाही. उदाहरणार्थ घरपट्टीची येणे रक्कम जर ९० कोटी असेल तर अर्थ संकल्पीय अंदाजामध्ये जमा सुध्दा ९० कोटी धरतो. ऐवढ उत्पन्न जमेला येत नाही. आणि परिणाम काय होतो आपण बघतो आहे. जमेची आकडे फुगत जातात. त्या तुलनेमध्ये आपण जमा तेवढी करु शकत नाही. आणि मग खर्चामध्ये मात्र १००% तरतुद केल्यामुळे आपण खर्चाच्या बाजुला १००% खर्च करण्याचा प्रयत्न करतो. ज्याच्या मधुन कामांना मान्यता दिल्या जातात. परंतु निधी उपलब्धते अभावी वार्षिक देणगी त्या वर्षामध्ये देऊ शकत नाही. आणि मग महानगरपालिकेचे दायीत्व वाढत राहतो. त्यासाठी आपल्याला आर्थिक व्यवस्था आणि आर्थिक नियोजन हे अश्या पध्दतीने केले पाहिजे की, काम झाल्यानंतर जर ते कर्मचाऱ्यांचे पगार असतील किंवा खाजगी

मक्तेदाराचे देणे असतील, पुरवठादाराचे देणे असतील. हे आपण त्या त्या आर्थिक वर्षामध्ये देऊ शकलो पाहिजे. अश्या पध्दतीचे आर्थिक नियोजन, म्हणजे वास्तव्याला धरुन आपण जमा आणि खर्चाचे अंदाज मांडले पाहिजे. आणि ते करण्याचा प्रयत्न आम्ही या वर्षी केलेला आहे. वसुली खर्चामध्ये २०४.८९ कोटी, भांडवली खर्चामध्ये २२४.०५ कोटी, असाधारण देऊ घेऊ मध्ये २९.३८ कोटी, परिवहन अर्थातच काही नाही.पाणी पुरवठयामध्ये २२.९२ कोटी, आणि अखेरची शिल्लक २९८.४२ कोटी अर्थातच ज्याच्यामध्ये ज्या शासकीय योजना सद्या आपल्या चालु आहे. याच्या मध्ये होणारा जो खर्च आहे. जो आज देखील आपल्याला दिसतो. असा एकुण मिळुन ७७९.६६ कोटी ऐवढी आपली या वर्षाची सुधारीत अंदाज आहे.आता जर २०२१-२२ च्या मुळ अर्थ संकल्पाकडे वळले तर आपल्याला आता मी सांगितल्याप्रमाणे या वर्षाला ८८ कोटी शिल्लक आणि पुढच्या वर्षीची आरंभची शिल्लक २९८.४४ कोटी आपल्याला अपेक्षित आहे. पुढच्या वर्षी, आपण याची सविस्तर चर्चा याच्या पुढे करु. वसुली जमा जी आपण २१५ कोटी अपेक्षित धरलेली आहे. त्याच्यामध्ये आपल्याला मेहनतपुर्वक, नियोजनपुर्वक वाढ करुन आपल्याला उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. त्या शिवाय आपल्याला महानगरपालिका चालविणे मुश्किल होणार आहे. त्याच वतीने महसुली जमा मध्ये आपण वाढ अपेक्षित करुन ३६३.५४ कोटी आपण अपेक्षित धरलेले आहे. अर्थात ही वाढ आपण कुठे आणि का धरलेली आहे. पुढे आपण सविस्तर चर्चा करणार आहोत. भांडवली जमे मध्ये ३९९.३६ कोटी, तर ही जी भांडवली जमा आहे. याच्यामध्ये पुढच्या वर्षी, आता सांगितल्या प्रमाणे भांडवली कामांसाठी दोन प्रकारे निधी होतो. एक आपल्या स्वत:च्या उत्पन्नामधुन काही शिल्लक राहणारी रक्कम आणि शासनाकडुन मोठमोठया कामांसाठी मिळणारी रक्कम पुढच्या वर्षी मिळणारी ३९९.३३ कोटी रक्कम म्हणजे साधारणता ४०० कोटीची जी जमा अपेक्षित आहे. त्याच्यामध्ये ३४५ कोटी आपण महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीतुन उत्पन्न करणार आहोत. अर्थात हे कुठुन उपलब्ध होतील हे आपण पुढे पाहणार आहोत. म्हणजे १४५ कोटी जर आपले याच्यामधुन गेले, तर साधारण २५५ कोटी हे आपल्याला राज्य शासनाकडुन वेगवेगळया अनुदानाच्या स्वरुपातुन अपेक्षित आहे. त्याच्यामध्ये अमृत योजनेचे, पाणी पुरवठयाच अनुदान असेल. घनकचऱ्याचे अनुदान असेल, प्रकल्पाचे अनुदान आहे. आपला जे १०० कोटीचा प्रकल्प आहे त्यापैकी ४२ कोटीचा निधी मंजुर झालेला आहे. ४८ कोटी आपल्याला मिळणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त ज्या इतर योजना आहे. सुवर्ण जयंती योजना असेल, नगरोत्थान असेल, दलितवस्ती असेल, आमदार निधी असेल खासदार निधी असेल, या सगळया निधींमधुन मिळणारे उत्पन्न व मिळणारे अनुदान या सगळयांचे साधारण आपण २५५ कोटी आपण अपेक्षित धरलेले आहे. पाणी पुरवठयामध्ये ४५.५२ कोटी खर्च अपेक्षित आहे आणि मलनिस्सारण मध्ये ६.७५ कोटी, हा जो आपल्याला जमा अपेक्षित आहे. मी पुढे याच्यामध्ये सांगेल. आपली जी भुयारी गटार योजना चालु होत आहे. साधारणता आपल्याला पुढच्या चार महिन्यामध्ये आपल्याला भुयारी गटरीचे काम पुर्ण होणे आणि तेथुन साधारण दोन महिन्यामध्ये प्रत्येक्ष एच.टी.पी.च काम पुर्ण होऊन ते कार्यान्वीत होणे अपेक्षित आहे. हे झाल्यानंतर आपल्याला नागरीकांच्याकडुन त्याची नळ जोडणी आणि जो आपण त्यांना जी सुविधा देतो. त्याच्यावरती काही प्रमाणामध्ये कर लावणे अपेक्षित आहे.त्याच्यापासुन जे मिळणारे उत्पन्न आहे. आता त्याचा तपशील मी पुढच्या स्थायी समिती सभेसमोर ठेवणार आहे. पुढच्या वर्षीचे एकुण अर्थ संकल्पीय जमा किंवा उत्पन्न ११,०६९ कोटी ७० लाख ऐवढे अपेक्षित आहे. आता याच्यामधुन खर्च जो होणार आहे. तो महसुली खर्च ४२३.५५ कोटी भांडवली खर्च ६०६.८८ कोटी, असाधारण देव घेव जी आहे. ती ७६.३२ कोटी, परिवहनावर अर्थात काही नाही. तर पाणी पुरवठयावर ४५.७४ कोटी मलनिस्सारण आणि ड्रेनेज स्कीम चालविण्यासाठी ६६.७५ कोटी आणि अखेर अखेर शिल्लक ही साधारण ६.४३ कोटी असा एकुण आपला खर्चाचा जो अंदाज आहे तो ११६९.७० कोटी ऐवढा आहे. म्हणजे जर आपण बोली भाषेमध्ये म्हटल तर महानगरपालिकेच या वर्षीच, म्हणजे ज्या आर्थिक वर्षाला आपण बजेट बनविलेले आहे. सन २०२१-२२ या वर्षाचा बजेट किती पडल तर आपण ११६९.७ कोटी असा आपण म्हणु शकतो. आता याच्यामध्ये आपण जमेचे ज्या बाजु धरलेल्या आहे. या मध्ये मी थोडक्या मध्ये काही मुद्दे आपल्या समोर मांडतो. मालमत्ता करापासुन सन २०२०-२१ म्हणजे चालु आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.५० कोटी इतके सुधारीत उत्पन्न धरण्यात आलेले आहे. मनपाच्या आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी थकित कराच्या वसुलीसाठी महानगरपालिकेला महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीत असलेले सर्व सक्तीचे वसुली बाबतचे सर्व अधिकार वापरुन कर वसुलीचा प्रमाण वाढविण्याबद्दल सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आलेल्या आहे. शहरातील सर्व मालमत्तांचा सर्वेक्षण पुर्ण करण्यात आलेला आहे. आपल्याला कल्पना आहे की, मालमत्ता कराचे मालमत्ताचे

सर्वेक्षण हे किमान चार वर्षातुन एकदा अपेक्षित आहे. परंतु या ना त्या कारणाने आपल्या महानगरपालिकेमध्ये नगरपालिका असतांना १९९९-२००० मध्ये जी रिव्हीजन झाली त्याच्यानंतर महानगरपालिकेच्या स्थापनेपासुन आज तागायत मालमत्तांचा फेर सर्वेक्षण किंवा मालमत्ता कराची फेर आकारणी ही करु शकलेलो नाही. ज्या मुळे मालमत्ता करापासुन मिळणारा उत्पन्न हे नेहमी वाढत असला पाहिजे. ते उत्पन्न आपल्याला वाढता दिसत नाही. पण साधारणता दोन वर्षापासुन आपण हे सर्वेक्षणाचे कामे सुरु केलेले आहे. आणि त्या सर्वेक्षणाचे कामे अंतिम टप्प्यात आलेल आहे. तर हे काम पुर्ण करण्यात आलेले असुन शहरातील मालमत्तांचे वार्षिक भाडे कर निर्धारणाचे काम सद्या सुरु आहे. या कामास गती देऊन चालु आर्थिक वर्षातच सर्व मालमत्तांचे फेर कर आकारणीचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे मनपाचे उत्पन्नात निश्चित भर पडणे अपेक्षित आहे. या रिव्हीजन मध्ये होणाऱ्या उत्पन्न वाढीसह पुढील आर्थिक वर्षामध्ये म्हणेज सन २०२१-२२ वर्षामध्ये मालमत्ता करापासुन ७५.३० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे. याच्यामध्ये एक आपल्याकडे मालमत्ता कराच्या बाबतीमध्ये जमीनीवर किंवा इमारतीवर लावलेले कर हा एक आपला वेगळा भाग आहे. जो प्रभाग अधिकाऱ्यांकडे सद्या कार्यरत आहे आणि दुसरा म्हणजे जे खुले प्लॉट आहे खुले भुखंड आहे. त्याच्यावरती जी आपण कर आकारणी करतो. त्यासाठी खुला भुखंड कर हा एक स्वतंत्र विभाग आहे. आणि तो विभाग हा मालमत्ता कर विभागाकडुन स्वतंत्र आहे. आम्ही आता जर आपण बघितल, तर खुला भुखंड करामध्ये जवळपास ३२ ते ३३ कोटी रुपये ऐवढयाची थकबाकी आहे. गेल्या काही एक वर्षामध्ये या विभागाकडे पुर्ण प्रमाणामध्ये प्रशासकीय लक्ष देण्यात आलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. गेल्या दोन वर्षामध्ये जेव्हा मी बजेटच्या बाबतीमध्ये मी आकडेवारी तपासली. आणि संबंधीत विभागाशी चर्चा केली. तर असेही लक्षात आले की, गेल्या दोन तीन वर्षापासुन बिल सुध्दा संबंधीत मिळकत धारकांना बजविण्यात आलेली नाही. आता जर बिलच बजविली नाही तर उत्पन्न होईल कस किंवा उत्पन्न जमा कस होईल. यासाठी म्हणुन या विभागामध्ये सुसुत्रता आणणे त्याच्यासाठी या पुढील आर्थिक वर्षात खुला भुखंड कर विभाग हा स्वतंत्र विभाग आपण बंद करुन याचा समावेश हा आपल्या रेग्युलर कर आकारणी विभागात करणार आहोत. आणि त्या त्या प्रभाग समितीचे जे प्रभाग अधिकारी असतील. त्यांच्या अंडर त्या प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात येणारे जे खुले भुखंड असतील. त्याच्या कराची आकारणी वसुली ही आपण देणार आहोत. जेणे करुन प्रभाग अधिकाऱ्याचा त्याच्यावर नियंत्रण राहील. त्या त्या प्रभागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हे खुले भुखंड कोण आहे त्याचे मालक कोण आहे. हे शोधुन काढणे अधिक शक्य होणार आहे. प्रभाग अधिकाऱ्यांच थेट नियंत्रण असल्यामुळ या कामाचा विकंद्रीकरण होऊन या कामाला आपल्याला गती येईल. मला असी अपेक्षा आहे की, याच्या मधुन पुढील आर्थिक वर्षामध्ये या वर्षी मिळणारे उत्पन्नाचे किमान दुप्पट ते तिप्पट उत्पन्न हे आपण मिळु शकतो. कारण खुला भुखंड हा सुध्दा आपल्या मालमत्ताच्या कर उत्पनाचा भाग आहे. पुढील आर्थिक वर्षापासुन आपण हे फेरबदल करु . जेणे करुन खुला भुखंड पासुन होणारी वसुली आपल्याला वाढविता येऊ शकेल. उत्पन्नाचा दुसरा आणि सर्वात मोठा आणि महत्वाचा तो म्हणजे आपले व्यापारी संकुले आणि गाळाधारक यांच्यापासुन मिळणारा उत्पन्न, महानगरपालिकेच्या एकुण २७ व्यापारी संकुलामधील एकुण ४६९१ दुकान गाळयांपैकी २३ व्यापारी संकुलांमधील एकुण २६०८ ची मुदत २०११-१२ पासुन वेगवेगळया आर्थिक वर्षामध्ये आतापर्यंत जर बघितल, गेल्या ७-८ वर्षामध्ये एकुण २६०८ दुकाने गाळेंच्या भाडेपट्टयाची मुदत संपलेली आहे.मुदत संपलेल्या गाळयांच्या बाबतीमध्ये मागील ७-८ वर्षामध्ये वेगवेगळया न्यायालयांमध्ये वेगवेगळया निर्णय झालेले आहे. जिल्हा न्यायालयामध्ये झालेले आहे, मा.औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये झालेले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये झालेले आहे. हे सगळे झालेले निर्णय आणि या निर्णयांच्या पार्श्वभुमीवर राज्य शासनाकडुन वेळोवेळी देण्यात आलेले महानगरपालिकेला आदेश, आपण वेगवेगळे ठराव, सन २०१२-१३ पासुन याच्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे. काहींच्या बाबतीमध्ये ते राज्य शासनाकडुन विखंडीत करण्यात आले. काहींच्या बाबतीमध्ये काही सुचना देऊन त्याच्या वरची स्थगिती उठविण्यात आली. असे वेळोवेळी राज्य शासनाकडुन वेळोवेळी आलेली सुचना, त्याच प्रमाणे अधिनियमातील कलम ७९ मध्ये, म्हणजे ज्या कामाअंतर्गत आपण महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडेपट्टयाने देतो किंवा हस्तांतरीत करतो. ही जी कलम ७९ आहे. या कलमामध्ये सन २०१८ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. आणि या सुधारणेनुसार या कलमाअंतर्गत राज्य शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका स्तरावर मालमत्ता भाडेपट्टा, नुतनीकरण अथवा हस्तांतरण नियम २०१९ हे बनविलेले आहे. ज्या नियमाप्रमाणे आपल्याला पुढील काळामध्ये पात्र असणारे गाळेधारकांची मुदतवाढ किंवा लिलाव जे काही पुढील कालावधीसाठी करणे अपेक्षित आहे. त्याच्यासाठी

आपल्याला नियम २०१९ मध्ये राज्य शासनाने भरुन दिलेले आहेत. अर्थातच हे राज्यस्तरीय नियम असल्यामुळे राज्याच्या अंतर्गत असलेल्या सर्व महानगरपालिकांना लागु झालेला आहे. या सगळयांचा विचार करुन या गाळयांचा पुढील कालावधीसाठी हस्तांतरणाबाबत सविस्तर प्रस्ताव प्रशासनामार्फत नुकताच मा.महासभेच्या पुढे निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नापैकी व्यापारी संकुलातुन गाळयापासुन मिळणारी उत्पन्न ही प्रमुख बाब असुन यावरच महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अवलंबुन आहे. त्यामुळे या विषयाबाबत सर्व बाबींचा विचार करुन त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे. गेल्या साधारणपणे ८ वर्षापासुन हा विषय प्रलंबीत असल्यामुळे मुदत संपलेले गाळयांची नुकसान भरपाईची रक्कम ही मोठया प्रमाणात येणे बाकी असुन ती वसुल करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेस त्वरीत कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. या मध्ये एक मुद्दा मी मा.सभागृहाच्या निदर्शनास आणु ईच्छितो की, जो काही विषय महासभेसमोर आहे. त्या महासभेसमोर असलेल्या विषयाप्रमाणे येथुन पुढच्या कालावधी मध्ये मुदत संपलेल्या गाळयांच्या फेर वाटपाबाबत आपण निर्णय घेणार आहोत धोरण ठरविणार आहोत. आता ते काही जरी असेल. एखाद्या गाळयाला मुदतवाढ मिळु शकेल तर एखाद्या गाळयाला मुदतवाढ मिळु शकणार नाही. तर तो ताब्यात घेऊन आपल्याला लिलाव करावा लागेल किंवा जे काही असेल. ते काही जरी निर्णय असला तरी सुध्दा मुदत संपल्यापासुन ते फेर हस्तांतरण करार होईपावेतोच्या कालावधीसाठी जो गाळा विद्यमान गाळे धारक वापरत आहे. त्याचे श्रेय आपल्या अधिनियमातील कलम ७९ क नुसार नुकसान भरपाईची रक्कम त्यांनी भरायची आहे. या नुकसान भरपाईच्या रकमेला पर्याय नाही. नुकसान भरपाईची रक्कम कशी ठरवावी याबाबतीत राज्य शासनाने वेळोवेळी महानगरपालिकेला सुचना दिलेल्या आहे. त्याच प्रमाणे २०१९ चे जे नियम आहे. त्या नियमामध्ये तरतुद आहे. त्या गाळयाचे प्रचलित बाजार भावानुसार जे काही होणारे बाजार मुल्य असेल, त्या बाजार मुल्याच्या ८% ऐवढे त्यांच्यावर नुकसान भरपाई किंवा भाडे असावे. आणि जे नुकसान भरपाई आहे म्हणजे अनधिकृतपणे हे जे गाळा वापरला जात आहे. त्याच्यासाठी दरमहा २% याच्या प्रमाणे त्याच्यावरती व्याज आकारावे. असे ८% त्याचे भाडे आणि त्याच्यावर २% व्याज असे एकत्रीतपणे नुकसान भरपाईची रक्कम ही आपल्याला महानगरपालिकेला त्याच्यामधुन आपल्याला वसुली करावी लागणार आहे. त्याप्रमाणे मुदत संपलेल्या गाळे धारकांना नुकसान भरपाईची बिले देण्याची कार्यवाही सद्या आपल्या मालमत्ता कर विभागामार्फत सुरु आहे. आणि त्याच्या मार्फत ती सगळी कार्यवाही करण्यात येत आहे. आता याच निमित्ताने एक मुद्दा मी सन्मा.सदस्यांसमोर मांडु ईच्छितो, आपल्याकडे व्यापारी संकुल हा एक वेगळा विभाग आहे. त्याच्यानंतर किरकोळ वसुली हा एक वेगळा विभाग आहे. काही प्रमाणामध्ये महानगरपालिका मालमत्ता पुर्वी नगररचना विभागामार्फत हस्तांतरीत झालेले आहे काही मालमत्तांचा हस्तांतरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत झालेले आहे. त्याच्यामध्ये एक सुसुत्रिपणा आणणे हे अत्यंत गरजेचे आहे. आज आपण जे जळगांव मध्ये बघितले तर अन्य महानगरपालिकेच्या तुलनेमध्ये सार्वजनिक मालमत्तेच्या बाबतीमध्ये आपण जळगांव महानगरपालिका श्रीमंत आहे असे म्हणतो. आपल्याकडे खुप मोठया प्रमाणामध्ये सार्व मालमत्ता आहे. जळगांव मध्ये असलेले सार्वजनिक मालमत्तेचे जर भाव विचारात घेतले. तर ते पुणे आणि मुंबईशी स्पर्धा करणारे आहे असे आपण म्हणतो. या सगळयांचा फायदा महानगरपालिकेला आर्थिक उत्पन्नाच्या स्वरुपात मिळणे आवश्यक आहे तो मिळत नाही. तो मिळतांना मात्र दिसत नाही. त्यामुळे आपण या मालमत्तांचा विनियोग, त्या संपुर्ण आपल्याकडे माहिती असणे, त्याचा विनियोग व्यवस्थितपणे करणे, मुदत संपल्यावर वेळोवेळी कार्यवाही करणे, गाळे हस्तांतरीत करत असतांना खुल्या जागा हस्तांतरीत करीत असतांना आपल्या कलमामध्ये एक तरतुद आहे अधिनियमामध्ये, कुठलीही भाडेपट्टयाने दिलेली जागा हे बाजार भावापेक्षा कमी दराने देता येणार नाही. त्यामुळे याचाही पुन्हा विचार करणे. आणि त्याच्यामधुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. या सगळयांचा एकत्रीतपणे विचार करण्यासाठी हा विभाग प्रशासकीय दृष्टया सक्षम करणे, आणि एका छत्राखाली आणणे गरजेचे आहे. त्यामुळे याच्यामध्ये मी पुढील आर्थिक वर्षापासुन हा एकत्रितपणे विभाग ज्याच्यामध्ये नगररचना विभागामार्फत दिल्या जाणारी जागा, बांधकाम विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या जागा इतर काही विभागामार्फत दिल्या जाणारे जागा. आणि याच्या वसुलीसाठी व्यापारी संकुल म्हणुन वेगळा विभाग, किरकोळ वसुली म्हणुन वेगळा विभाग, असे स्वतंत्र विभागांचा एकत्रिकरण करुन एक मालमत्ता व्यवस्थापन विभाग हा प्रस्तावीत करत आहोत. या मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे प्रमुख हे उपायुक्त राहतील. या विभागाचे अंतर्गत महानगरपालिकेच्या विभागाच्या असलेल्या सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करणे, त्याच प्रॉपर्टी रजिष्टर अद्यावत

करणे, ज्या मालमत्ता भाडेपट्टयाने दिलेल्या आहेत त्याच्या संबंधीतची कागदपत्र अद्यावत करणे, भाडेपट्टयाची मुदत संपली असेल तर त्या ताब्यात घेऊन पुढील काळासाठी हस्तांतरण करण्याचे धोरण ठरविणे. जी काही भाडे आकारणी आहे. भाडे आकारणी नियमाप्रमाणे झालेली आहे की नाही ते तपासणे, नसेल झालेली तर त्या मध्ये आवश्यक ती सुधारणा करणे. आणि प्रत्येक्ष भाडे वसुली करणे या व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या इतरही मालमत्तांकडुन मिळणारे जे उत्पन्न आहे. आता उदाहरणार्थ दैनिक बाजार फी आहे. रस्त्यावर जी हॉकर्स बसतात त्यांच्याकडुन आपण ठेका पध्दतीने वसुली करतो. ही सुध्दा महानगरपालिका एक प्रकारे महानगरपालिकेच्या मालमत्तेकडुन मिळणारे उत्पन्न आहे. किंवा आपल्याकडचे वेगवेगळे मार्केटस असतील. मटन मार्केट असेल, मच्छी मार्केट असेल भाजी मार्केट असेल, या सगळया मार्केटपासुन मिळणारे उत्पन्न हे महानगरपालिकेच्या मिळकतींपासुन मिळणारे उत्पन्न आहे. आपण या सर्व विभागांचे एकत्रिकरण करुन आपण एकच महापालिका स्तरावरती मालमत्ता कर विभाग करणार आहोत. आणि एक एप्रिल पासुन किरकोळ वसुली असे स्वतंत्र विभाग या नावाने न ओळखले जाता, मालमत्ता व्यवस्थापन (State Management Department) या नावाने ओळखले जातील. आणि ते उपायुक्त सारख्या एका जबाबदार अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली दिले जातील. जेणे करुन मालमत्तांचे स्वरक्षण करणे त्याचे नियोजन आणि त्याच्यापासुन मिळणारा उत्पन्न, या बाबी आपण प्रभावीपणे करु शकतो. त्याला आपण सर्व जण मान्यता द्याल अशी मी अपेक्षा करतो. नगररचना विभाग, सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षात नगररचना विभागासाठी एकुण ५९.९७ कोटी इतके सुधारीत उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेले असुन सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये ९.४६ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. राज्य शासनाने नुकतेच एकात्मीक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली तयार केलेली असुन त्यानुसार अनुज्ञेय एफ.एस.आय. मध्ये लक्षणेप्रमाणे वाढ केलेली आहे. तसेच छोटे भुखंडावरील बांधकाम परवानगीची प्रक्रिया ही सुलभ करण्यात आलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, १५० स्के.मी. पेक्षा कमी क्षेत्र असलेले जे प्लॉट आहे. त्याच्यासाठी महानगरपालिकेची स्वतंत्र बांधकाम परवानगीची गरज नाही. त्यांनी स्वत: प्लॅन तयार करायचा आहे. एका आर्किटेक कडुन बनवुन घ्यायचे आहे. आणि त्या प्लॅन प्रमाणे सेम पॅसेज करुन त्याची जी काही डेव्हलप्मेंट फी आहे. ती महानगरपालिकेमध्ये चलनाने भरुन टाकायची आहे. हे जे महानगरपालिकेमध्ये भरलेले चलन आहे. हे चलन म्हणजे त्याला दिलेले कमेन्समेंट सर्टीफीकेट आहे. १५० स्के.मी.पेक्षा जास्तीला बांधकाम परवानगी लागणार आहे. परंतु या पुढील कालावधी मध्ये जेथे प्रमाणपत्र आहे, बिम चेकींग सर्टीफीकेट त्याची अट काढुन टाकण्यात आलेली आहे. ते आर्किटेक्टने सर्टीफाय करायच आहे. अर्थात बांधकाम नियम बहाल केला असेल, तर त्याला जरी जेथे प्रमाणपत्र कंपलसरी नसेल, तर भोगवटा प्रमाणपत्र कंपलसरी आहे. भोगवटाप्रमाणपत्र घेत असतांना जर जोत्याचा बांधकाम नियमबहाय असेल तर त्याला भोगवटाप्रमाणपत्र मिळण्यामध्ये अडचण येऊ शकते. त्यामुळे बांधकाम करणारा व्यवसायीक आणि आर्किटेक यांची संयुक्तीक जबाबदारी असणार आहे. त्यांनी आपल्याला सर्टीफाय करुन द्यायचे आहे की, हे बांधकाम सॅन्कशन प्लॅन प्रमाणे आहे. काही प्रमाणामध्ये टी.डी.आर.च्या बाबतीमध्ये जे इनव्हेसमेंट आणि जे इंफ्रास्ट्रक्चर इमप्रुमेंट चार्जेस होते आय.आय.सी. ते आता टी.डी.आर.वापरावरचे रद्द झालेले आहे. परंतु प्रिमियम वापरावरचा जो एफ.एस.आय.आणि टी.डी.आर. आहे. त्याच्यामध्ये वाढ केलेली आहे. एक त्याच्यामधुन सर्वसाधारणपणे त्याचे तज्ञ लोकांच्या म्हणण्यानुसार असे दिसत आहे की, पुढील कालावधी मध्ये बांधकाम क्षेत्राला अधिक उंचीची अवस्था येईल. बांधकाम अधिक गतीने विकसीत व्हायला लागेल. आणि ज्या प्रमाणे महानगरपालिका हद्दीमध्ये बांधकामे वाढतील. त्याच प्रमाणे आपल्याला मिळणारा उत्पन्नही वाढणार आहे. नवनविन मिळकती जर विकसीत झाल्या तर त्यापासुन मिळणारे आपल्याला मिळकत कराचा उत्पन्न जे आहे. ते ही वाढणार आहे. आणि एकुण शहर विकासाला चालणा मिळेल. दुसरी गोष्ट याच्यामध्ये जे वेगवेगळे दर कमी केलेले आहे आणि बांधकाम परवानगीची प्रक्रिया सुलभ केलेली आहे. याच्यामुळे नवनिर्माण क्षेत्राला एक चालना मिळेल. आणि शहरामध्ये वापरासाठी असणारे घरांची संख्या वाढेल. अर्थातच त्याचे दर मर्यादीत राहतील. आपल्याला कल्पना असेल, स्टॅम्प ड्युटी सुध्दा शासनाने २% ने कमी केलेली आहे. या सगळयाचा परिणाम म्हणुन किफायती दरांची जर संख्या वाढली तर आज जे आदरणीय पंतप्रधानांचा जो महत्वकांशी प्रकल्प आहे. जे सन २०२२ पर्यंत चालेल. याला पुरक अश्या प्रकारचा धोरण आहे. आणि याच्यामधुन घरांची निर्मीती त्यातल्या त्यात किफायतशीर दराने वाढु शकेल. आणि दरामधला हा जो राहण्याचा प्रश्न आहे. बऱ्याचश्या नागरीकांचा सुटु शकेल. असे एकुण या यु.डी.सी.पी.आर.च्या बाबतीमध्ये राज्य शासनाचा धोरण आहे. त्याला अनुसरुन आपल्याला यापुढील कालावधी मध्ये जे आपण क्रिडाईच्या

संदर्भात बैठक घेतली. त्याला अनुसरुन आपणही आपल्या पातळीवरती या सगळयांना गती देता येईल अश्या पध्दतीच्या आपण उपाययोजना करणार आहोत. या सर्व प्रक्रियेमध्ये महानगरपालिकेला सुध्दा या विभागापासुन मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे. पाणी पुरवठा-पाणी पुरवठा आकारापासुन सन २०२०-२१ या वर्षासाठी एकुण २१.४६ कोटी इतके सुधारीत उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेले आहे. सन २०२१-२२ या वर्षामध्ये एकुण ३०.५० कोटी रुपये अपेक्षित आहे. नजिकच्या काळामध्ये सद्या सुरु असलेले अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण होणार आहे. जुन्या वाहिन्यावरील नळ कनेक्शन नविन पाईप लाईनवर आपण जोडुन देत आहोत. जे नळ कनेक्शन अधिकृत आहे असे नळ कनेक्शन आपण अमृतच्या लाईनवर जोडुन देत असल्यामुळे अनधिकृत नळ कनेक्शन ते आपोआप बंद होणार आहे. ज्याच्याकडे कर भरल्याची पावती असेल, टॅक्सची पावती असेल, याची खातरजमा करुनच आपण त्यांना अमृतच्या नविन वाहिणीवर नळ कनेक्शन देत आहोत. ज्यामुळे ज्यांचे अनाधिकृत नळ आहे, जे पाणीपट्टी भरत नाही. ज्यांच्याकडे कुठलेही अधिकृत कागदपत्रे नाही. ते नळ कनेक्शन अनाधिकृत असल्यामुळे ते आपण जोडुन देणार नाही. त्यामुळे मनपाची पाणी चोरी पासुन होणारे जे नुकसान आहे. बऱ्याच अंशत: कमी होईल असा अंदाज आहे. अर्थात ज्यांचे अनाधिकृत नळ कनेक्शन आहे. त्यांची कायमस्वरुपी गैरसोयी होऊ नये म्हणुन त्याला महानगरपालिकेला रितसर मागणी करुन नविन नळ कनेक्शन देण्याची व्यवस्था आम्ही करत आहोत. त्यामुळे अधिकृत नळांची संख्या वाढुन पाणीपट्टीच्या उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे. सदर पाणीपुरवठा कार्यान्वीत करत असतांना आपल्याला कल्पना आहे या विषयी आपण आदरणीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये सुध्दा सविस्तर चर्चा केलेली आहे. ही योजना कार्यान्वीत करत असतांना काही योजना डिझाईन करत असतांना २४ x७ या तत्वाने शहरात पाणी पुरवठा होईल. हे गृहीत धरुन ही योजना डिझाईन केलेली आहे त्यामुळे २४ x७ या पध्दतीने अधिक परिणामकारक पध्दतीने पाणी पुरवठा होण्यासाठी शहरामध्ये प्रत्येक नळ कनेक्शनला पाण्याचा मिटर बसविणे आवश्यक आहे. यासाठीचा जो खर्च लागणार आहे. या खर्चाची उभारणी सार्वजनिक खाजगी भागेदारी म्हणजे पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप या पध्दतीने करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने विचारात घेतलेला आहे.याबाबत सन्मा.पदाधिकाऱ्यांच्या पुढे एक प्राथमिकतेचा प्राधिकरण झालेला आहे. आणि जे ईच्छुक आहे. आता याच्यावर सविस्तर व्हाय.एम.डी.टी.चा जो अहवाल आहे. व्यवहाराचा अहवाल हे बनविण्याचे काम ते करत आहे. तो अहवाल आल्यानंतर आपल्याला त्याच्यावर निर्णय घेऊन आपल्याला पुढच्या कामासाठी वाटचाल करावी लागेल. मलनिस्सारण - सन २०२१-२१ या वर्षाच्या पाहिल्या साली म्हणजे साधारणता सप्टेंबर २०२१ पर्यंत भुयारी गटार योजनेचे जे काम आहे व ते पुर्ण होणे अपेक्षित आहे. आणि या अंतर्गत मल प्रक्रिया प्रकल्प जे आहे. CBS Plant, हे कार्यान्वीत होणार आहे. हा एच.टी.पी. कार्यान्वीत झाल्यानंतर प्रत्येक घराचा जो शौचालय आहे आणि सांडपाणी आहे याचा कनेक्शन हे आपण आता रस्त्यावरती ज्या मेनहोलच्या शेजारी जे आपण प्रॉपर्टी चेंबर्स लावलेले आहे. त्या चेंबर्सला आपण जोडणार आहोत. मलनिस्सारण योजना कार्यान्वीत झाल्यानंतर त्या योजनेच्या कार्यान्वये, देखभाल आणि दुरुस्ती या खर्चासाठी महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मलप्रवाह कर लागु केलेला आहे. त्याप्रमाणे आपली भुयारी गटार योजना पुर्ण झाल्यानंतर ज्या भागामध्ये आपण भुयारी गटार योजनेची सेवा देणार आहोत. त्या ठिकाणाच्या प्रत्येक घराचे ज्या ठिकाणी सेप्टीक टँक असतील त्या ठिकाणी बायपास करुन आपण शौचालयाचे आऊटलेट आणि सांड पाण्याचा आऊटलेट हे दोन्ही एकत्रीत करुन आपण प्रापर्टीच्याकडे जोडणार आहोत. हे जोडत असतांना शहरामध्ये असे प्रकारचे काम करणारे प्लंबरची आपल्याला एक पॅनल टिम बनवावी लागेल. त्याचे दर ठरवुन द्यावे लागतील की, या दराप्रमाणे आणि या पॅनल मधल्या कुठल्याही लायसन्स असणाऱ्या प्लंबर कडुन नागरीक आपल्या स्वत:च्या प्रॉपर्टीचे कनेक्शन आपल्या स्वत:च्या बळावर जोडु शकतील. अर्थात यासाठी जशी आपण पाणी पुरवठा जोडणी फी आपण देतो. त्या प्रमाणे प्रत्येक सांडपाणी जोडणी फी आपल्याला आकारावी लागेल. आणि त्याच प्रमाणे एकदा ते जोडल्यानंतर जे सेप्टीक टँक आहे तो डिसकनेक्ट होणार नाही, त्या सेप्टीक टँकचे मेनटेनन्स त्याची स्वच्छता हा नागरीकांचा खर्च वाचणार आहे. किंवा जे नविन घर बांधत आहे त्यांना सेप्टीक टँक बांधण्याची आवश्यकता नाही. डायरेक्ट आपल्या टॉयलेटच्या सांडपाण्याचा आऊटलेट हे आपल्या भुयारी गटार योजनेला जोडता येईल. त्यामुळे नागरीकांच्या या पुढच्या वन टाईम कॉस्टमध्ये आणि दैनंदिन येणाऱ्या खर्चामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात बचत होणार आहे. आणि आता चांगल्या पध्दतीने आपल्या शहरात स्वच्छता करुन देणार आहे. कारण आपलाकडची जी गटार पध्दती आहे. या गटारींचा वापर फक्त

पाऊसाळयातले जे पाणी आहे, स्टॅर्म वॉटर ऐवढच वाहुन जाण्यासाठी होईल.त्यामुळे सांडपाणी आणि अन्य जे वेस्टेज आहे. हे जर गटार मध्ये आले नाही. तर गटार स्वच्छतेवरची तक्रार आणि त्याचा खर्च काही प्रमाणामध्ये कमी होणार आहे. त्यामुळे जे मलप्रवाह आपण जोडुन देणार आहोत. त्याच्यासाठी आपल्या अधिनियम १२७ मधील तरतुद केलेली आहे. त्याप्रमाणे ज्यांना आपण हे मलप्रवाह जोडणी करणार आहे. त्यांच्यासाठी आपल्याला हे मलप्रवाह कर हा लावणे आवश्यक आहे. ज्या ज्या शहरांमध्ये भुयारी गटार योजना आहे. त्या त्या सर्व शहरात अश्या प्रकारचे कर लावलेले आहे. त्यामुळे मी या निमित्ताने ही योजना पुर्ण झाल्यानंतर पुढील आर्थिक वर्षामध्ये महासभेचे मान्यतेने मलप्रवाह कर हा नव्याने लागु करण्याचा हा नविन कर असणार आहे. आम्ही प्रस्तावीत करत आहे. अर्थात हा लागु करत असतांना तो करयोग्यमुल्यावर किंवा भांडवली मुल्यावर आधारीत असणार आहे. याच्या बद्दलचा सविस्तर प्रस्ताव हा धोरणात्मक निर्णयासाठी मान्यतेसाठी महासभेला योग्य वेळेला सादर करु. मा.महासभेच्या निर्णयानंतर नळ जोळणीसाठी नागरीकांना परवानगी देत असतांना त्याची जोडणी फी आकारणी आणि मलप्रवाह कर लागु करणे, यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात येईल. आणि जो काही कराचा दर महासभा ठरवेल किंवा जो जोडणी शुल्क महासभा ठरवेल. त्या प्रमाणे आपल्याला नागरीकांवर आकारणी करता येईल. आणि याचा काही अंशी अंमलबजावणी हे पुढील आर्थिक वर्षाच्या सहाव्यामध्ये करणे अपेक्षित राहणार. घरकुल : गेंदालाल, शिवाजी नगर, वाल्मीक नगर, खेडी, पिंप्राळा जुने आणि नविन घरकुले या ठिकाणी घरकुलांचे बांधकाम करुन आपण शहरामधल्या आर्थिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या किंवा त्यावेळेला ते गल्लीच्छ वस्ती मध्ये किंवा स्लम मध्ये राहणारे लोक होते. त्यांना आपण हस्तांतरीत केलेले आहे. त्यावेळेला नगरपालिकेने ठरविलेले रोजानुसार प्रत्येक घरकुल धारकांकडुन सर्व सुविधा पुरविणे कामी त्यांच्याकडुन दररोज रु.५/- या प्रमाणे सेवा शुल्क आकारणे अपेक्षित आहे. परंतु सदर रक्कम घरकुल धारक भरणा करत नाही. नाकारता आणि न येण्यासारखी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सेवा शुल्काची थकबाकी आता पर्यंत जवळपास १५ कोटी रुपये इतकी झालेली आहे. सदर रकमाची वसुलीसाठी महानगरपालिकेला परिणामकारक उपाययोजनेच उपयोग करावा लागणार आहे. यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्याची नियुक्ती करुन या लोकांशी चर्चा करुन त्यांची मानसिकता बदलुन आपल्याला ही वसुली करणे आवश्यक आहे. कारण या ठिकाणी घरांचा संपुर्ण खर्च हा महानगरपालिकेने केलेला आहे. जागा ॲकवायर करण्याचा खर्च महापालिकेने केलेला आहे. त्याठिकाणी नागरी सुविधा पुर्णपणे पाणी कनेक्शनसह हे महानगरपालिका देत आहे. अश्या वेळेला या सुविधांपोटी जो असा अत्यंत माफक रोजचा रु.५/- आहे. म्हणजे वर्षाला साधारणता १५०० ते १७०० रुपये ऐवढया प्रकारचा जो सेवा शुल्क आहे.या नागरीकांनी भरणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला नागरीकांची माणसिकता बदलुन त्याच्यातला आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या याच्या दृष्टीने परिणामकारक उपाययोजना करावी लागेल. विविध शुल्कांची आकारणी : महानगरपालिकेमार्फत प्रभाग स्तरावर नागरीकांनी वेळोवेळी लागणारे उतारे, देणे किंवा मिळकती विक्री होतांना त्यांचे हस्तांतरण करणे, इत्यादी सेवा देण्यात येतात. अर्थात याच्यापासुन मिळणारे उत्पन्न हे वर्षासाठी अत्यंत नगण्य आहे. २ ते २.५ लाख, परंतु यासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्कामध्ये वाढ सुचविण्यास त्याबद्दलचा तपशील हा अंदाजपत्रकासोबत दिलेला आहे.ते अत्यंत किरकोळ स्वरुपाचे आहे. उदा.खरेदी विक्री झाल्यानंतर महानगरपालिकेच्या रजिष्टरला नाव बदलुन घेणे किंवा नोड्युजचा दाखला घेणे किंवा अनेक रु.५/-, रु.१०/- मध्ये जे फक्त सेवा घेण्याचा विषय आहे. ज्यांना या सेवेची गरज लागणार नाही ते हे भाडे भरणार नाही. सर्वांसाठी घरे योजना : प्रधानमंत्री आवाज योजने अंतर्गत सर्वांसाठी घरे सन २०२२ पर्यंत या योजनेपासुन जळगांव महानगरपालिकेला राज्य शासनाकडुन आता पर्यंत १८ हजार घरकुले बांधण्याचा उद्दिष्ट करुन दिलेला आहे.या योजनेमुळे झोपडपट्टीचा विकास होऊन झोपडपट्टी निर्मुलन होईल आणि नागरीकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे. तथापी या योजने अंतर्गत जो बि.एन.सी. कम्पोनंट आहे. पेडीटीरीलेस कन्स्ट्रक्शन म्हणजे मजदुर असलेल्या वैयक्तीक मालकीच्या जागेवर घरबांधकाम करणे या कार्यक्रमाचे घती ही अर्थात खुप कमी दिसत आहे. त्यामुळे आपले उद्दिष्ट पुर्ण होण्यामध्ये विलंब लागणारा दिसत आहे. त्यामुळे आपल्याला या कार्यक्रमाला गती देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पुढील वर्षामध्ये त्यासाठी नेमलेल्या टेक्नीकल कन्सलटंटची मदत घेऊन आपल्याला परिणामकारक उपाययोजना करावे लागणार आहे. घनकचरा व्यवस्थापन :महानगरपालिका केंद्र आणि राज्य शासनाच्या अनुदानी योजना अंतर्गत रक्कम रु.३०.३६ कोटी घनकचरा प्रकल्प मंजुर झाला असुन त्यासाठी निधी प्राप्त झालेला आहे. या अंतर्गत सद्या आव्हाणे शिवार येथे

पुर्वी साठलेल्या कचऱ्यावर बायोमाईनींगची प्रक्रिया करुन काही प्रमाणावर जागा ही कचरा मुक्त करण्यात आलेली आहे. त्याच्यात अद्यापही सुमारे ८० मॅटरीक टन कचरा हा प्रक्रिया अभावी तेथे पडुन आहे. उर्वरीत असेलेल्या कचऱ्यावर बायोमाईनींग प्रक्रिया करणे आणि अन्य काही तांत्रिक बाबी विचारात घेऊन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचा सुधारीत अहवाल आपण मा.महासभेच्या मान्यतेने जो ४९ कोटी रुपयांचा आहे राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे. याच्यासाठी तांत्रिक मान्यता मिळणे अंतिम टप्प्यात आहे. कालच मा.मुख्य सचिवांचे आदेश प्राप्त झालेल्या आहे. मुख्य अधिकार समिती समोर हा विषय होता. आपल्याला खात्री आहे. ४९ कोटीच्या सुधारीत प्रकल्पाला आपल्याला राज्य शासनाची मान्यता मिळेल. अशी मान्यता मिळाल्यानंतर उर्वरीत प्रक्रिया पुर्ण करुन त्याठिकाणी पुर्वी जी जागा पुर्ण कचऱ्याने भरलेली होती. ती जागा आपण मोकळी करणार आहोत. मोकळया झालेल्या जागेवर आपल्याला कचऱ्यावरील प्रक्रिया करण्याचा जो प्रकल्प आहे. त्याचे काम सुरु करणे आवश्यक आहे. हे काम सुध्दा आपल्याला या आर्थिक वर्षामध्ये करता येईल.म्हणजे सन २०२१-२२ मध्ये असा अंदाज आहे. समाविष्ट विभाग : महिला व बालकल्याण विभाग या विभागासाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु.२ कोटी इतकी तरतुद सुचविण्यात आलेली आहे. महिला बालकल्याण विभागामार्फत शिक्षिका, मदतनीस यांना मानधन देणे, विद्यार्थ्यांना पोषण आहार, शिष्यवृत्ती, पुस्तकवाटप, त्याच प्रमाणे महिन्याची वैद्यकीय तपासणी किंवा अन्य महिला आणि बालकल्याण विषय इतर सर्व कार्यक्रम हाती घेणे, आता ८ मार्चला महिला दिन आलेला आहे. महिला महोत्सव सादर करणे, इत्यादी कार्यक्रम हाती घेऊन महिला बालकल्याण विभागासाठी अर्थ संकल्पात झालेली तरतुदीचा खर्च करणेबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. अर्थात आपली महिला बालकल्याण समिती जी आहे याच्यात निश्चित पुढाकार येईल आणि पुढील आर्थिक वर्षामध्ये मागील काही वर्षाचे तुलनेमध्ये या कार्यक्रमांवर आपण अधिक खर्च करु शकु. अशी आपली अपेक्षा आहे. त्याच प्रमाणे दिव्यांग कल्याण योजनेसाठी २ कोटी रुपये इतकी तरतुद सुचविण्यात आलेली आहे. आता आपल्याकडे दिव्यांग कल्याणाच्या फारश्या योजना नाही. त्यामुळे त्याचा खर्च खुप कमी प्रमाणात झालेला दिसतो. हा खर्च वाढावा. दिव्यांगांना कायद्यानुसार मिळालेले त्यांचे हक्क मिळावे आणि चांगल्या पध्दतीने त्यांना जिवन जगता याव. यासाठी आपल्या राज्यातील अन्य महानगरपालिकेमध्ये जी विविध दिव्यांग कल्याण योजना आहेत. त्याची माहिती घेण्याचे काम चालु आहे. उपायुक्तांना या सुचना दिलेल्या आहेत.अश्या प्रकारे विविध महानगरपालिकेमध्ये राबविण्यात येणारे योजनांची माहिती घेऊन ज्या योजना आपल्याला आपल्या महानगरपालिका क्षेत्रात राबविता येईल. याच्याबाबतीमध्ये धोरण मा.महासभेसमोर ठेवुन आपण येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये या योजना कार्यान्वीत करण्याचा आपण प्रस्तावीत करत आहे. त्याच प्रमाणे शहरामधील आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांसाठी सुध्दा २ कोटी तरतुद आपण सुचविलेली आहे. महिला बालकल्याण असेल, आर्थिक दृष्टया दुर्बल असतील किंवा दिव्यांग व्यक्ती असतील. ज्यांच्यासाठी कायद्यात बंधन असेलेली तरतुद आपण करतो आहे. परंतु केवळ या तरतुदी ऐवढया पुरत्या मर्यादीत न राहता, जर याच्यासाठी जादा खर्च अपेक्षित असेल, तरी सुध्दा मला खात्री आहे की, महासभेच्या मान्यतेने आपण पुढील आर्थिक वर्षामध्ये आता प्रस्तावीत केलेल्या तरतुदीपेक्षा सुध्दा जर खर्च जास्त होत असेल, तर त्यासाठी वाढीव तरतुद करुन देण्यासाठी सुध्दा प्रशासन या निमित्ताने कटीबध्द राहणार आहे. सर्वसाधारणपणे महानगरपालिकेच्या हे महत्वाच्या योजना केल्यानंतर सद्या सर्वत्र जर आपण बघितल तर पाणीपुरवठा योजना आपली मार्गी लागत आहे. भुयारी गटार योजना मार्गी लागत आहे. घनकचरा प्रकल्प योजनेला आपल्याला मान्यता मिळत आहे. पथदिव्यांची योजना सुध्दा साधारणता पुर्णत्वाला येत आहे. म्हणजे या महत्वाच्या नागरी सुविधांमध्ये आपण नागरीकांना अधिक चांगल्या पध्दतीने सेवा देऊ शकतो आहे. परंतु एक विषय मात्र आपल्या पुढे सद्या आहे. ज्यावेळेला अमृतचा पाणी पुरवठा आणि भुयारी गटारीचे काम पुर्ण होईल आणि ज्या वेळेला शहरामधील खोदाई पुर्ण होईल. त्यावेळेला आता जे रस्त्यांच्या खोदाईमुळे रस्त्यांची जी दुरावस्था झालेली आहे. ही रस्त्यांची दुरावस्था तातडीने दुर करणे आणि नागरीकांना याच्यासाठी किमान चांगल्या सुविधा देऊन आता जे शहरामधले प्रदुषन असेल किंवा नागरीकांना होणारा जो त्रास आहे रस्त्यांच्या दुरावस्थेचा तो तातडीने आपल्याला कमी करणे गरजेच आहे.याच्यासाठी म्हणुन पुढील वर्षाच्या अर्थ संकल्पामध्ये महानगरपालिकेच्या उत्पन्नामधुन वरील तरतुद करणे ही आपली सर्वांची मागणी आहे. आणि त्याप्रमाणे आपण करण्याचा प्रयत्न करतो आहे. मला या निमित्ताने सांगावा अस वाटत, महानगरपालिकेच्या स्वत:च्या उत्पन्नामधुन पुढील आर्थिक वर्षामध्ये १०४ कोटी ऐवढी तरतुद आपण रस्त्यांसाठी सुचवित आहोत

की, जेणे करुन शहरामधील किमान महत्वाचे रस्ते आपण नविन पध्दतीने करु शकु. याच्या व्यतिरिकत जे रस्ते आपल्याला पुढील आर्थिक वर्षात नव्याने करता येणार नाही. ते नंतरच्या आर्थिक वर्षात आपल्याला करावे लागतील. त्याच्यासाठी डांबरी पध्दतीने पॅचवर्क करणेसाठी सुध्दा आता आपण उपलब्ध करुन दिलेली १५५० कोटीची तरतुद तशीच ठेवुन पुढील आर्थिक वर्षामध्ये सुध्दा नव्याने तरतुद सुचविण्यात आलेली आहे. जेणे करुन शहरामधील रस्ते किमान खड्डे मुक्त करुन आपल्याला नागरीकांना देता येईल. आणि शहरामधील जे महत्वाचे रस्ते आहे वाहनांच्या वाहतुकीसाठी असे रस्ते साधारण १०४ कोटीच्या तरतुदी मधुन आपल्याला करता येईल. याच प्रमाणे जी १०० कोटी रुपयाची आपल्याला नगरोत्थान योजना शासनाने स्वत: मान्य केलेली आहे. ४२ कोटी रुपयांची जी आपल्याला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्याच्यापैकी निधी सुध्दा आपल्याला देणेबाबत शासनाने आश्वासित केलेले आहे. याच्यामध्ये येणाऱ्या अडचणी दुर करुन हा प्रकल्प जर मार्गी लावला, तर त्याच्यामध्ये १६-१७ कोटी रुपयांची रस्त्यांची कामे असे एकत्रीतपणे महानगरपालिकेचा निधी, राज्य शासनाकडुन मिळणारा जास्त अनुदान, आणि या ४२ कोटी मधुन रस्त्यासाठी मिळणारा अनुदान एकत्रीतपणे जर आपण हे निधी पुढच्या आर्थिक वर्षामध्ये खर्च करु शकलो. तर मला वाटते शहरामध्ये महत्वांचे रस्त्यांची तरी दुरावस्था आपण निश्चितपणे दुर करु शकतो. बजेटच्या आकडेवारी मध्ये फार तपशीलात न जाता महत्वाच्या बाबी मी आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती राहील की, आपला अनुभव खुप मोठा आहे. आपण या क्षेत्रामध्ये कार्यरत आहात. आपल्याला ग्राऊंड रियालीटी माहित आहे.नागरीकांच्या अपेक्षा आपल्याला माहित आहे. या सगळयांचा विचार करुन या बजेटची आपण तपासणी करावी व अभ्यास करावा. आणि मग स्थायी समिती जे काही नियोजन करेल. त्याप्रमाणे या अर्थ संकल्पावरती आपले विचार व्यक्त करुन मुदतीमध्ये मा.महासभेसमोर पाठविणे अपेक्षित आहे. या निमित्ताने काही बाबतीमध्ये वेगवेगळया सन्मा.पदाधिकाऱ्यांचा आभार व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो. भारताचे पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छ भारत मिशन अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना, मलनिस्सारण योजना, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना तसेच अन्य योजनेच्या मार्गे मधुन जळगांव शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी भरीव असे प्रकारचा निधी आणि योगदान आपल्याला शासनामार्फत मिळालेला आहे. त्याबद्दल मी आदरणीय पंतप्रधान आणि केंद्र शासनाचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो. केंद्र शासनाच्या बरोबरीने राज्य शासनाचे सुध्दा आपल्याला वेळोवेळी भरीव स्वरुपाचे अनुदान आणि मदत ही मिळत आलेली आहे. यासाठी मी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय नगरविकास मंत्री त्याच प्रमाणे जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच सन्मा.खासदार, विधानसभा तसेच विधान परिषदेचे आमदार यांनी महानगरपालिकेला दिलेल्या सक्रीय सहकार्याबद्दल त्यांचे ही मनपुर्वक आभार व्यक्त करतो. जळगांव शहर महानगरपालिकेच्या माध्यमातुन जळगांव शहराच्या नागरीकांच्या अडीअडचणी दुर करुन त्यांना जास्तीत जास्त प्रकारेच्या चांगल्या दर्ज्याच्या सेवा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय प्रक्रियेत तसेच त्याच्या प्रत्येक्ष अंमलबजावणी मध्ये प्रशासनाला वेळोवेळी मार्गदर्शन करीत असेलेले आदरणीय महापौर, आदरणीय उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधीपक्ष नेते, सर्व पक्षाचे गटनेते, सर्व सन्मा.नगरसेवक यांचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो. जळगांव शहरातील सर्व वृतपत्र आणि वृतवाहिण्यांचे पत्रकार त्यांचे प्रतिनिधी यांनी महानगरपालिकेच्या विविध योजनांना सकारात्मक कार्यांना सातत्याने प्रसिध्दी देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करतो. महानगरपालिकेसमोरील शहरातील नागरीकांना देण्याच्या सोईसुविधांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ करण्यामध्ये आव्हान महानगरपालिकेसमोर आहे. महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ आणि मर्यादीत आर्थिक क्षमता यांचा योग्य ताळमेळ मिळुन पुढील वर्षामध्ये अधिक समाधानकारक सेवा देण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्याचा या निमित्ताने आपण संकल्प करु या. सादर केलेला अंदाजपत्रकांचा योग्य विचार करुन अंतिम मान्यतेसाठी आपण महासभेत सादर करावे. अशी या निमित्ताने मी आदरणीय स्थायी समिती सभापती व सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांना विनंती करीत आहे. धन्यवाद जयहिंद, जय महाराष्ट्र.

श्री.कुलभुषण पाटील :- आपण जो अर्थ संकल्प सादर केला, त्याचा आम्हाला अभ्यास करणेसाठी सगळी माहिती जाणुन घ्यायची आहे त्याचा अभ्यास करायच आहे. त्याच्यामुळे ही सभा तहकुब करावी. आणि हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा असे मी आपल्याला विनंती करतो.

मा.सभापती :- मा.आयुक्त साहेब यांनी सन २०२०-२१ च्या सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्यांना त्याची प्रत देण्यात आलेली आहे. साहेबांनी त्यांच्या मनोगतात जे महत्वाचे विषय होते. त्या संदर्भात सखोल अशी चर्चा करुन माहिती दिलेली आहे. आणि डोबळ मनाने सर्व स्थायी समिती सदस्यांचा आज जरी अभ्यास झाला असेल. तरी सखोल अभ्यास करणेसाठी सर्व सदस्यांना या अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास व्हावा म्हणुन आजची ही सभा आपण तहकुब करत आहोत.आणि पुढील सभेची आपल्याला सर्वांना तारीख कळविण्यात येणार आहे. यानंतर नगरसचिवांनी पुढील नियमित सभेच्या विषयांना सुरुवात करावी व सभेच्या शेवटी राष्ट्रगीत घ्यावा.

सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१४ पारित करण्यात आला.

असा ठराव करणेंत येत आहे की, आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे कडील पत्र क्र./जशमनपा/लेखा/८१३/२०२०-२०२१ दि.१५/०२/२०२१ अन्वये आयुक्त यांचेकडुन स्थायी समितीपुढे सादर होणारे सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण व निवेदन स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबींवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी सदर सभा तहकुब करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सर्वानुमते मंजुर

अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००

सुचक :- पाटील कुलभुषण विरभान

अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ

सही/-
सभापती
स्थायी समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव